# कारले पिकावरील कीड ओळख आणि नियंत्रण

**प्रा. वैभव गिरी**
सहाय्यक प्राध्यापक
कृषि किटकशास्त्र विभाग
रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी-वर्धा

महाराष्ट्रात सध्या सर्वदूर रात्रीची थंडी हवा व दिवसाचे कडक ऊन या वातावरणामुळे कारले या भाजीपाला पिकांवर रसशोषक किडींचा, फळ पोखरणाऱ्या अळीचा व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झालेला आहे. अश्या वातावरणात अळीच्या वाढण्याची शक्यता असते. कारले पिकावरील किड ओळख आणि त्यावरील उपाय योजना या संदर्भात हा लेख शेतकरी बांधवांनो आपणास नक्कीच उपयोगी पडेल.

**१) फळमाशी:** फळमाशी ही कीड खरीप व उन्हाळी दोन्ही हंगामात आढळते. परंतु खरीप हंगामात जास्त प्रादुर्भाव असतो. या किडीचे मादी पतंग कळीच्या त्वचेमध्ये अंडी घालतात. अंडी उबवून अळ्या फळांमध्ये वाढतात. त्यांची अळी अवस्था पूर्ण झाली की फळाला छिद्र पाडून बाहेर येतात. फळमाशी लागलेली फळे वाकडी होतात व बरीचशी फळे त्याजागी पिकलेली दिसतात. अळ्या फळात राहून गर खातात, त्यामुळे फळे सडतात आणि अकाली पक्व होतात. हे किटक फळातील गरामध्ये दिसून येतात व त्यामुळे फळगळ दिसून येते.



**उपाय:** १) वेळोवेळी बाधित फळे काढून नष्ट करा. २) पिकाच्या काढणी नंतर व लावणीपूर्वी शक्यतो उन्हाळ्यात शेताची खोल नांगरट करा. ३) मुख्य पिकाबरोबर विलायती गवत, मुळा, कोथिंबीर या पिकांची लागवड एकाच शेतात करू नका. ४) क्ल्यु-ल्युरचे एकरी १० सापळे लावावेत. ६) मॅलॅथिऑन ४ मि.लि. + २० ग्रॅम गूळ एकत्र करून २ लिटर पाण्यात मिसळून पिकाच्या वेगवेगळ्या भागात पात्रात ठेवावे विषयुक्त गोड पाणी पिऊन माश्या मारतात. ७) रासायनिक नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५% एस. सी. २ मिली किंवा थियोडिकर्ब ७५% डब्ल्यू. पी. १० ग्राम प्रती १० लीटर पाण्यात घेऊन फवारणी करा.

**२) नाग अळी:** नाग अळी पानांवर सफेद रंगाच्या रेषा ओढते.



**उपाय:** स्पीनटोराम ११.७ % एस.सी. ४ मिली किंवा ॲसिफेट ५०%+ इमीडाक्लोप्रिड १.८ एस. सी. १० ग्राम किंवा फ्लोनीकॅमिड ३ मिली १० लिटर पाण्यातून फवारा.

**३) पांढरी माशी:** पांढरी माशी पानातील रस शोषण करते व पिकात मोझाईक व्हायरस पसरवते.



**उपाय:** असिटामिप्रीड २० % एस.पी. २ ग्राम किंवा असिफेट ५०% + इमीडाक्लोप्रिड १.८ एस. सी १० ग्राम किंवा फ्लोनीकॅमिड ३ मिली प्रती १० लीटर पाण्यातून फवारा.

**४) अंकुर आणि मुळे खाणारी अळी:** ही अळी पिकाचे मातीतील मुळाचे व खोडाचे नुकसान करते.

**उपाय:** कार्बोफ्युरान ३ जी ४ किलो प्रती एकर सरीत टाका व उभ्या पिकातील नियंत्रणासाठी क्लोरपायरीफॉस २०% ई. सी २० मिलि प्रती १० लिटर पाण्यात घेऊन सिंचनाच्या पाण्यातून आळवणी करा.

**५) पाच पायांचा ढेकूण:** गर्द काळी जांभळी ढेकूण अंकुर आणि फळातील रस शोषून घेते. अंकुर वळतात व फळांवर गर्द काळा वर्तुळाकार ठिपका दिसून फळे गळतात.

**उपाय:** तीव्रता कमी असल्यास ५ % निंबोळी अर्क पाण्यातून फवारा. तीव्रता जास्त असल्यास इमिडाक्लोप्रिड १७.८% एस.एल. ५ मिलि किवा फिप्रोनील ५% एस.सी. १० ग्राम थायमीथोक्झाम २५% ड्ब्लु.पी. ३ ग्राम किवा डायमिथोएट ३०% ई.सी. २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारा.

**६) मावा:** मावा कीड प्रकारात पिल्ले व प्रौढ पानातील रस शोषून घेतात त्यामुळे पाने वाकडी होतात तसेच विषाणूजन्य रोगांचा प्रसार करतात.



**उपाय:** असिटामिप्रीड २० % एस.पी. २ ग्राम किंवा असिफेट ५०% + इमीडाक्लोप्रिड १.८ एस. सी १० ग्राम किंवा फ्लोनीकॅमिड ३ मिली प्रती १० लीटर पाण्यातून फवारा.

(संपर्क: +९१ ९१४६४१२२१०)

★ ★ ★